# ठाण्यातील स्थलांतरित लोकांचे शहर नियोजनावर ओझे

१५ एप्रिल २०१४

रूपाली घाटे

GreenEarth

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
contactus.greenearth@gmail.com

(नागरी विकासाच्या नीलप्रतीसाठी)

# ठाण्यातील स्थलांतरित लोकांचे नियोजनावर ओझं

## नैसर्गिक लोकसंख्या वाढीच्या आधारावर स्थलांतरितांचा अंदाज

महाराष्ट्रातील लोकसंख्या वाढीचा दर हा १९.४८ आहे.

या दराप्रमाणे ठाण्याची लोकसंख्या २००१ मध्ये ९.७४ लाख असायला हवी होती, पण ती याच वर्षी १२.६२ लाख होती. हा फरक २.८८ लाख एवढा आहे.

म्हणजेच ठाण्यामध्ये २.८८ लाख स्थलांतरित लोक असू शकतात.

## शहर विकास योजने प्रमाणे स्थलांतरितांचा अंदाज

आकडेवारी तंतोतंत नसल्याने शहर विकास योजने मध्ये ४०% लोकसंख्येमधील वाढ स्थलांतरितांमुळे आहे, असे नमूद केले आहे.

> **शहर विकास योजनेच्या सांगण्यानुसार, २००१ मध्ये स्थलांतरितांची लोकसंख्या ५.०५ लाख एवढी आहे तर आपल्या अंदाजानुसार ती याच वर्षी २.८८ लाख आहे.**

# स्थलांतरितांमुळे ठाणे शहर प्रशासनाला नियोजन करताना ताण येतो!

### शहर विकास योजना ठाणे, पान ५

“पायाभूत सोयीसुविधांवर व शहराच्या अर्थव्यवस्थेवर वाढत्या लोकसंख्येचा ताण जाणवत आहे, व ही परिस्थिती यापुढे आणखी बिकट होणार आहे.”

### शहर स्वच्छता योजना - प्रकरण ९: पाणी पुरवठा, पान १०२

“ठाणे महानगरपालिकेच्या टेमघर शुध्दीकरण केंद्रावर, सतत होणाऱ्या स्थलांतरितांमुळे वाढत्या पाण्याच्या मागणीचे नियोजन करणे कठिण होतं आहे”.

### शहर स्वच्छता योजना - प्रकरण १२: Improved Services to Urban Poor in the City, पान १५५

“महाराष्ट्रातील गावांकडून व राज्याच्या इतर भागांमधून होणाऱ्या स्थलांतराच्या समस्येने ठाणे शहराला ग्रासले आहे.... यामुळे सार्वजनिक वापराच्या आरक्षणांवर झोपडपट्ट्या वाढतात. आणि त्यांना सोयी-सुविधा पुरवण्यासाठी व पुनर्वसन करण्यासाठी महानगरपालिकेला अधिक खर्च करावा लागतो.”